औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची बुधवार दि. ३०. ५. ९० रोजी दुपारी ३.०० वाजता नासिक येथे झालेल्या ५० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

---

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. श्री. ईश्वर भोसीकर | सभापती/औरंगाबाद मंडळ |
| २. श्री. अ. म. महाजन | उपसभापती/औ. मं |
| ३. श्री. अजय दुआ<br>विभागीय आयुक्त/नासिक | सदस्य |
| ४. श्री. अजय मेहता<br>प्रशासक/म. न. पा. नासिक. | सदस्य |
| ५. श्री. द. मो. गोडघाटे,<br>उपसंचालक नगररचना औरंगाबाद. | सदस्य |

विभागीय आयुक्त औरंगाबाद व आयुक्त म. न. पा. औरंगाबाद हे पूर्वसूचनेने सभेस अनुपस्थीत होते.

विषय क्र. १: दिनांक २५. ४. ९० रोजी झालेल्या ४९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. २६७

दिनांक २५ ४. ९० रोजी झालेल्या ४९ व्या सभेच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होऊन कायम करण्यांतआला.

विषय क्र. २: औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने गोल्फ क्लबजवळनासिक येथे बांधलेल्या प्रशासकीय इमारतीत उपसंचालक नगररचना नासिक यांना कार्यालयासाठी मुदत वाढ देण्याबाबत.

ठराव क्र. २६८

मंडळाने याविषयावर सविस्तर चर्चा करुन असा निर्णय घेतला की, उपसंचालक नगररचना, नासिक विभाग, नासिक यांना २८२.०३ चौ. मी. जागा रु. ५/- दर चौ. फुटाप्रमाणे रु. १४, ५९५/- दरमहा प्रमाणे कार्यालयीन पत्र क्र. मु. अ/औबाद/नासिक २५१८ दि. ११. ४. ८४ अन्वये कळविलेल्या अटीच्या आधीन राहून नगररचना, नासिक यांच्या कार्यालयास दिनांक ३१. ३. १९९१ पर्यन्त मुदत वाढवून देण्यास मंडळाने मान्यता दिली.

विषय क्र. ३: औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने पंचवटी नासिक येथे उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखाली बांधलेले १८ निवासी गाळे एक रक्कमी खरेदी पध्दतीवरुन भाडेखरेदी तत्वावर वर्ग करण्याबाबत.

. . . .

याविषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळाच्या सदस्यांना माहिती दिली की, मंडळाने पंचवटी, नासिक येथे १६ व्यापारी गाळे व १८ निवासी गाळे बांधले आहे. वरील गाळयांना प्रशासकीय मान्यता अशी दिली आहे की, गाळे एक रक्कमी.. खरेदी पध्दतीवर वाटप करण्यांत यावेत. या योजनेतील एका गाळयाची किंमत रु. १,२१,५०० आहे असे उपसभापतींनी सांगितले. सदर गाळयांच्या वाटपासाठी नासिक येथील वर्तमानपत्रातून जाहिरात देऊन देखील प्रतिसाद मिळाला नाही त्यामुळे सदर गाळे भाडेखरेदी पध्दतीवर वर्ग करण्यांत यावे.

यावर मा. विभागीय आयुक्त नासिक श्री. अजय दुआ यांनी असे विचारले की, याठिकाणाचा बाजारभाव काय आहे व मंडळाच्या गाळयांची एका चौ. फुटाची किती किंमत पडते आणि या गाळयाचे बांधकाम क्षेत्रफळ किती आहे.

यावर उपसभापतींनी या भागातील बाजारभाव रु. ३०० ते ३२५ इतका असल्याचे सांगितले व या गाळयाच्या एका चौ. फुटाला रु. २०८ इतका दर येतो व या गाळयाचे बांधकाम क्षेत्रफळ ४६.१६ चौ. मी [४९६.६५ चौ. फुट] असल्याचे सांगितले.

यावर मा. श्री. अजय दुआ आयुक्त, नासिक यांनी सांगितले की, मंडळाचा दर हा फारच कमी आहे व उच्च उत्पन्न गटातील लोकांना परवडणारा आहे. त्यामुळे परत जाहिरात देऊन इतर खाजगी संस्थांशी संपर्क साधून गाळयासंबंधी सविस्तर माहिती द्यावी.

ठराव क्र. २६९

पंचवटी, नासिक येथे उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेखाली बांधलेल्या १८ निवासी गाळयांसाठी परत वर्तमानपत्रातून जाहिरात द्यावी व खाजगी व इतर संस्थांशी संपर्क साधून गाळे एक रक्कमी खरेदी पध्दतीवर वाटप करावे असा निर्णय मंडळाने सर्वानुमते घेतला.

विषय क्र. ४: उपजिवीकेसाठी आजुबाजूच्या ग्रामीण भागातील शहराकडे येणाऱ्या स्थलांतरीतांच्या निवाऱ्याचा विचार करुन संभाव्य झोपडपट्टी वाढ थांबविणेबाबत.

. . .

याविषयावर चर्चा करतांना विभागीय आयुक्त नासिक श्री. दुआॅसाहेब यांनी नासिक येथील संभाव्य झोपडपट्टीवाढ थांबविण्याबाबत मंडळाच्या सदस्यांना सखोल माहिती दिली. श्री. दुआॅसाहेब यांनी सांगितले की, नासिक शहरात ग्रामीण भागातून उदरनिर्वाहकरिता स्थलांतरीतांचे लोंढे धाव घेतात व अशा लोकांना निवासाची सोय नसल्यामुळे शहरातील फुटपाथ(व इतर मोकळया जागेचा आश्रय घेतात. विभागीय आयुक्तांनी असेही सांगितले की, नासिक शहराच्या विकास आराखडयात उपजिविकेसाठी आजुबाजूच्या ग्रामीण भागातून शहराकडे येणाऱ्या लोकांसाठी ४ भूखंड वेगवेगळया भागात आरक्षीत केलेले आहेत सदर जमिन ३५ हेक्टर असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावर चर्चा होऊन खालील प्रमाणे योजनेसंबंधीची कल्पना मांडली.

१. ग्रामीण भागातून औद्योगिककरणामुळे उदरनिर्वाहकरिता शहरात येणाऱ्या माणसास एका वर्षाकरिता संक्रमण शिबीरवजा घरे तयार करयांत येणाऱ्या कॅम्पमध्ये ठेवण्यांत यावे.

२. सदर व्यक्तीने त्या कॅम्पमध्ये एक वर्ष वास्तव्यकेल्यास तो कायमस्वी विकसित भूखंड घेण्यास पात्र होईल सदर भूखंड पैसे भरुन विकत घेऊ शकेल.

३. सदर योजना राबविण्यासाठी एकमेकात समन्वय असावा यासाठी कार्यकारी अभियंता नासिक व प्रशासक म. न. पा. नासिक यांनी एकमेकांशी संपर्क ठेवावा.

या प्रकल्पाची सविस्तर कल्पना मांडल्यानंतर विभागीय आयुक्त नासिक यांनी सांगितले की, सदर प्रकल्प [योजना] पायलट योजना म्हणून राबवावयाची आहे. ही योजना तयार करुन महानगरपालिकेने मंडळामार्फत शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावी व या योजनेसाठी श्री राजगोपालचारी यांचेही मार्गदर्शन घ्यावे.

ठराव क्र. २७०

याविषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, नासिक येथे उपजिविकेसाठी आजुबाजूच्या ग्रामीण भागातून शहराकडे येणाऱ्या स्थलांतरीतांच्या तात्पुरत्या निवाऱ्याचा [संक्रमण शिबीरवजा]

. . ४

प्रश्न सोडविण्यासाठी नासिक विकास आराखड्यामध्ये ४ ठिकाणी ३५ हे. जमिन आरक्षीत केली आहे. त्या जमिनीवर आयुक्त म. न. पा. नासिक व कार्यकारी अभियंता नासिक यांनी संयुक्तपणे योजना तयार करावी व म. न. पा. आयुक्तांनी मंडळामार्फत शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावी.

विषय क्र. ५: विडी कामगारासाठीच्या गृहनिर्माण योजने अंतर्गत नांदेड येथे सर्व्हे क्र. ३ व ४ या शासकीय जमिनीवर कार्यान्वीत करण्यांत आलेल्या अल्प उत्पन्न गटा अंतर्गत २१० गाळयांच्या योजनेच्या वाटपाबाबत.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी सांगितले की, नांदेड येथे सर्व्हे क्रमांक ३ व ४ या शासकीय जमिनीवर अल्प उत्पन्न गटान्तर्गत विडी कामगारांसाठी घरे बांधलेली आहे. परंतु विडी कामगारांकडून मंडळास आवश्यक असणारे कागदपत्रे, गाळयाच्या सुरुवातीस भरावयाची रक्कम इत्यादी बाबीसाठी प्रतिसाद मिळत नाही. मंडळाने त्यांना वारंवार पत्रव्यवहार करुन, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता वरिष्ठ लिपिक इत्यादी कर्मचा-यांनी प्रत्यक्ष संपर्क साधून देखील विडी कामगाराकडून प्रतिसाद मिळत नाही म्हणून उपसभापतींनी अशी सूचना केली की, सदर गाळे सर्वसाधारण जनतेसाठी खुले करुन वाटप करावे. यावर मा. सभापतींनी अशी सूचना केली की, विडी कामगारांना पुन्हा अेकदा संधी द्यावी व २१० गाळ्या व्यतिरिक्त असलेले ६० गाळयांची जाहिरात त्वरीत काढून सर्वसाधारण जनतेस वाटप करावे जेणे करुन लोक तेथे रहावयास जातील व विडी कामगारांना देखील या गाळयाविषयी उत्सुकता वाटेल.

ठराव क्र. २७१

या बाब टिप्पणीवर सखोल चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, नांदेड येथे विडी कामगारांसाठी बांधलेल्या २१० गाळया व्यतिरिक्त ६० गाळयांची जाहिरात देऊन सर्वसाधारण जनता व आरक्षित विगतवारीतील जनतेकडून अर्ज मागवुन गाळयाचे वाटप करावे.

विषय क्र. ६: लातूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्म शताब्दी वर्षानिमित्त राबवावयाची विशेष गृहनिर्माण योजना.

नगरपरिषद क्षेत्रात गृहनिर्माण योजना अधिक वेगाने कार्यान्वीत करण्यासाठी शासकीय अनुदानातून स्वतंत्र सेल स्थापन करणे व याकामासाठी नगरपरिषदांना तांत्रिक सल्ला देणेसाठी फी आकारणेबाबत.

ठराव क्र. २७२

याविषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, नगरपरिषदांना गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी योजनेची आखणी, आराखडे आणि अंदाजपत्रके तयारकरणे, हुडकोकडून कर्ज मिळवून देणे, निविदा मागवून कंत्राटदाराची निवड करण्यास मदत करणे. बांधकाम करित असतांना सर्वसाधारण पाहणी व मदत करणे, तांत्रिक सल्ला देणे यासर्व कामाबद्दल प्राधिकरणाने दिनांक १ ऑगष्ट ७८ च्या पत्रान्वये नगरपरिषदांना कळविल्याप्रमाणे प्रकल्प खर्चाच्या २% टक्के एवढी रक्कम [कन्सलटन्सी चार्जेस] तांत्रिक सल्ला व मदत फी म्हणून आकारण्यास मंडळाने मान्यता दिली व सदर प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्याचा निर्णय घेतला.

विषय क्र. ७:- उच्च उत्पन्न गटांतर्गत नविन औरंगाबाद सिडको येथे बांधलेल्या ८२ गाळयापैकी एक गाळा मंडळाच्या कामा करिता आरक्षित ठेवण्याबाबत.

. . . .

चर्चा करतांना उपसभापतींनी असे सांगितले की, औरंगाबाद मंडळाने नविन औरंगाबाद येथे विविध उत्पन्न गटान्तर्गत एकुण १०७१ गाळे बांधले असून ते लाभधारकांना भाडेखरेदी तत्वावर वाटप करण्यांत आलेले आहे. मंडळाने नविन औरंगाबाद येथे उच्च उत्पन्न गटातील ८२ गाळे बांधले आहे. प्राधिकरण परिपत्रक क्र. एमएच/ईएमआर/१०८०/११८०८/इएम-९ दि. १९. २. १९८२ प्रमाणे एक गाळा आरक्षित ठेवता येतो. अशा प्रकारचा गाळा सुरवातीस ठेवला नव्हता पण वाटपाचे वेळेस एका गाळेधारकाने वाटप रद्द केल्यामुळे उपलब्ध झालेला गाळा प्रतिक्षा यादीवर इतर कोणी अर्जदार नसल्यामुळे शिल्लू राहला.

उपरोक्त वसाहतीतील गाळेधारकाकडे मासिक हप्त्याची थकबाकी वसुली करण्यासाठी म. गृ. नि. व क्षे. वि. कायदा १९७६ सेक्शन ६६ प्रमाणे सक्तीने वसुली करण्यांत येते जर गाळेधारकाने त्याचेकडे असलेली थकबाकी दिली नाही तर वसुलीपोटी त्यांच्या योग्य अशा सामानाची जप्ती केली जाते. जप्तीचे सामान ठेवण्यास दुसरा गाळा उपलब्ध नसल्याने त्याकरिता गाळ्याची आवश्यकता असल्याचे उपसभापतींनी प्रतिपादन केले.

सिडको नविन औरंगाबाद येथील १०७१ गाळयांची वसुली पंजाब नॅशनल बँकेकडे दिलेली आहे व तदर बँकेचे काउंटर उघडण्यासाठी देखील रिकाम्या गाळयाची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे मंडळाकडे वर्ग-१ चे अधिकारी प्रतिनियुक्तीवर आल्यावर त्यांना सेवानिवासस्थानासाठी हया २ बेडरूम असलेल्या गाळयाचा उपयोग होऊ शकतो.

ठराव क्र. २७३

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की, ८२ गाळे उच्च उत्पन्न गट [एन ६] नविन औरंगाबाद येथील एक गाळा मंडळाच्या वर्ग-१ चे प्रतिनियुक्त अधिका-यासाठी निवासस्थान, वसुली व इतर कामासाठी राखीव ठेवावा.

विषय क्र. ८: गाळे वाटपासाठी विलंब झालेल्या लातूर येथील ४६ गाळयाचे राखण व संरक्षण करण्यासाठी चौकीदाराकरिता खर्चाची रक्कम कंत्राटदाराला अदा करण्याबाबत.

. . .

याविषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी सांगितले की, मंडळाने लातूर येथे ४६ मध्यम उत्पन्न गटान्तर्गत गाळे बांधलेले आहे. तदर गाळे पाणीपुरवठया अभावी गाळे पूर्ण होऊनही लाभधारकांना वाटप करता आले नाही. एमआयडीसीकडून जानेवारी ९० ला पाणीपुरवठा करण्यांत आल्यानंतर गाळयाच्या वाटपास सुरुवात केली. गाळयाच्या वाटपासाठी झालेल्या विलंबाच्या कालावधीत गाळयाचे राखण कंत्राटदाराने चौकीदार ठेवून केलेले असल्याचे कार्यकारी अभियंता/औरंगाबाद यांनी कळविलेले आहे. तसेच निवेदेतील मेंटेनन्स पीरीएडच्या अटीप्रमाणे काम संपल्यानंतर सहा महिनेपर्यन्त कंत्राटदाराने गाळयाची विनामुल्य देखभाल केली. कंत्राटदाराने एकुण ६ महिन्यासाठी चौकीदार नेमून वाटप न झालेल्या गाळयाचे राखण व संरक्षण केलेले आहे असे उपसभापतींनी सांगितले. गाळे वाटपास उपलब्ध झाल्यावर लाभधारकाने गाळयाचा ताबा उशिरा घेतल्यामुळे देखभालीसाठी होणारा हा खर्च त्याचेकडून वसुल करण्यांत यावा अशी मंडळाच्या सदस्यांनी सूचना केली.

ठराव क्र. २७४

१. याविषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, कंत्राटदाराने एकुण ६ महिन्यासाठी चौकीदार नेमून वाटप न झालेल्या

गाळयाचे राखण व संरक्षण [वॉच अॅण्डवॉर्ड] केलेले असल्यामुळे त्यासाठी कंत्राटदाराने राखण व देखभालीसाठी खर्च केलेल्या रकमेची प्रतिपूर्तीपोटी रु. ९६००/- मंजूर करण्यांत येत आहे. परंतु सदर काळात बांधकामाचे काही नुकसान, तुटफुट व चोरी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कार्यकारी अभियंता यांनी ठेकेदारास रिकाम्या घराकरिताच वॉच अॅण्ड वॉर्डची रक्कम व्यवस्थीत तपासून खात्री करुनच अदा करावी.

२] गाळेवाटपास उपलब्ध झाल्यावर देखील गाळयाचा ताबा उशिरा घेतल्यामुळे देखभालीसाठी होणारा हा खर्च लाभधारकांकडूनच वसूल करण्यांत यावा.

आयत्यावेळचा विषय

विषय:-औरंगाबाद येथील सीटीएस नं. २०७१९ मधील १.६९ हेक्टर जमिनीवर मंडळाची प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत.

ठराव क्र. २७५

नियोजित प्रशासकीय इमारतीचा नकाशा, आराखडे मंडळाच्या पॅनलवर असलेले अर्किटेक्ट श्री. तावडे यांच्याकडून करुन घेण्यास व भूमिपूजन कार्यक्रमास मंडळाने मान्यता दिली.

. . . .

पठाण/